P-4

Regd. No. MAH. 223 /

F-9184 (रायगड)

## परिशिष्ट "ब"

## कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल.
## या संस्थेचे विधानपत्र

1) संस्थेचे नांव : कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल

2) संस्थेचा पत्ता : व्दारा – डॉ. प्रकाश शिवदास पाटील
लाईफ लाईन हॉस्पीटल, लाईन आळी, शिवाजी रोड, पनवेल
केतकी हॉटेल समोर, पनवेल, रायगड.

3) संस्थेचे उद्देश : 1) बालवाडीपासुन ते उच्च महाविदयालयापर्यंत शिक्षण देणे, आश्रमशाळा तांत्रिक विदयालय, कन्याशाळा, पॉलिटेकनिक, औदयोगिक प्रशिक्षण वैदयकिय महाविदयालय, वैदयकीय क्षेत्रात काम करणा-या पॅरामेडीकल एक्सरे, टेक्नीशीयन, पॅथॅलॉजी लॅब टेक्नीशीयन, नर्सींग कॉलेज व इतर वैदयकीय क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांचे प्रशिक्षण महाविदयालये, कृषी महाविदयालय, डी.एड.बी.एड., लॉ कॉलेज या सारख्या शिक्षणाचे प्रशिक्षण देणे, गरिब व होतकरु मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत करणे. वसतीगृहाची सोय उपलब्ध करुन देणे. गरजू लोकांना वैदयकिय मदत उपलब्ध करुन देणे. वैदयकिय शिबीरे भरविणे, वाचनालय, व्यायामशाळा, चालविणे, महिलासाठी भरतकाम, विणकाम, शिवणकाम, यांचे प्रशिक्षण देणे. वृध्दाश्रम, अनाथश्रम, अंध, मुकबधीर विदयालय चालविणे.

2) जलसंधारण योजनाबाबत माहिती गरजूंना देणे. व त्याबाबत मार्गदर्शन करणे. संस्थे मार्फत जलसंधारण योजना कार्यान्वीत करण्यासाठी मार्गदर्शन करणे. पाणी आडवा, पाणी जिरवा या बाबत मार्गदर्शन करणे. कृती अंमलात आणणे व ग्रामीण विकास आदर्श ग्राम योजना ज्या सरकार मार्फत सेवाभावी संस्थाना राबविण्यात देण्यात येतात. त्या राबविणे उदा. पाणलोट क्षेत्र विकास योजना राबविणे. महिलासाठी कुटीरउदयोग, ग्रामीण उदयोग, गृहउदयोग, लघुउदयोग यांचे बाबत मार्गदर्शन करणे. आरोग्य रक्षण करणे.

3) शेतक-यांना कृषी विषयक मार्गदर्शन करणे. कृषी विषयक ज्ञान, तंत्रज्ञान, व प्रशिक्षण तज्ञ यांची माहिती देणे. कृषी विषयक औषधे खते-बियाणे, या बाबत संमेलने व चर्चासत्रे मेळावे व परिषदा भरवुन शेतक-यांना माहिती देणे वृक्ष लागवड जल संवर्धन पर्यावरण संतुलन विषयक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड अलिबाग
22.06.2023

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग, रायगड-अलिबाग
सत्यमेव जयते

2/-

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

4) ग्रामीण व शहरी व आदिवासी मागास भागात विविध प्रकारच्या सामाजिक, शैक्षणिक व अपंग कल्याण विषयक योजना राबविणे व दारुबंदी, हुंडा बंदी, कुटुंबकल्याण प्रौढ शिक्षण इ. बाबत विकासाची कामे करणे.

4) कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळाकडे सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे. अश्या पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदाची संपूर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहेत.

| अ. नं. | नाव | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.डॉ. प्रकाश शिवदास पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, शिवाजी रोड, पनवेल रायगड | अध्यक्ष | 45 | वैद्यकीय | भारतीय |
| 2. | श्री. शिवदास रावजी पाटील | ओम अमित हौसिंग सोसायटी, ए विंग शिवाजी रोड, पनवेल रायगड | उपाध्यक्ष | 70 | शेती | भारतीय |
| | सौ. डॉ.जयश्री प्रकाश पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, शिवाजी रोड, पनवेल रायगड | सेक्रेटरी | 39 | वैद्यकीय | भारतीय |
| | श्री. जी. आर. रानमाळे | ओमकार हौसिंग सोसायटी पनवेल, रायगड | खजिनदार | 66 | पेन्शनर | भारतीय |
| 5. | श्री. पराग उत्तमराव बेडसे | अजिंक्य पॉलिक्लीनिक, सेक्टर 18, सी/6/9/4, नवीन पनवेल, रायगड. | सदस्य | 38 | इंजिनिअर | भारतीय |
| 6. | सौ. सुशिला उत्तमराव बेडसे | अजिंक्य पॉलिक्लीनिक, सेक्टर 18, सी/6/9/4, नवीन पनवेल, रायगड. | सदस्य | 55 | घरकाम | भारतीय |
| 7. | सौ. प्रगति संजय पाटील | बी6/26/2, सेक्टर 15, आय.पी.सी.एल. कॉलनी नवीन पनवेल. | सदस्य | 25 | नोकरी | भारतीय |
| 8. | सौ. स्मिता सलील ठाकरे | अजिंक्य पॉलिक्लीनिक, सेक्टर 18, सी/6/9/4, नवीन पनवेल, रायगड. | सदस्य | 36 | घरकाम | भारतीय |

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | सौ. संजीवनी अशोक पाटील | ओम अमित हौसिंग सोसायटी, ए विंग शिवाजी रोड, पनवेल रायगड | सदस्य | ३५ | घरकाम | भारतीय |
| 10 | सौ. ज्योति डी. पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, दुसरा माळा, शिवाजी रोड, पनवेल रायगड | सदस्य | ३६ | घरकाम | भारतीय |
| ११ | श्री. गोरख त्रिबंक पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, तिसरा माळा, शिवाजी रोड, पनवेल रायगड | सदस्य | ६६ | पेन्शनर | भारतीय |

५) आम्ही खालील सह्या करणार कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरिल उद्देशाने आम्ही एकत्र येवून वरिल संस्था ही आज दिनांक 4/4/2000 रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ. नं. | नाव | पत्ता | सह्या/- |
|---|---|---|---|
| १. | श्री.डॉ. प्रकाश शिवदास पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, शिवाजी रोड, पनवेल रायगड | [signature] |
| | श्री. शिवदास रावजी पाटील | ओम अमित हौसिंग सोसायटी, ए विंग शिवाजी रोड, पनवेल रायगड | [signature] |
| ३. | सौ. डॉ.जयश्री प्रकाश पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, शिवाजी रोड, पनवेल रायगड | [signature] |
| ४. | श्री. जी. आर. रानमाळे | ओमकार हौसिंग सोसायटी पनवेल, रायगड | [signature] |
| ५. | श्री. पराग उत्तमराव बेडसे | अजिंक्य पॉलिक्लीनीक, सेक्टर १८, सी/६/९/४, नवीन पनवेल, रायगड. | [signature] |
| ६. | सौ. सुशिला उत्तमराव बेडसे | अजिंक्य पॉलिक्लीनीक, सेक्टर १८, सी/६/९/४, नवीन पनवेल, रायगड. | [signature] |
| ७. | सौ. प्रगति संजय पाटील | सी६/२६/२, सेक्टर १५, आय.पी. सी.एल. कॉलनी नवीन पनवेल. | [signature] |
| ८. | सौ. स्मिता सतीश ठाकरे | अजिंक्य पॉलिक्लीनीक, सेक्टर १८, सी/६/९/४, नवीन पनवेल, रायगड. | [signature] |

४/-

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | सौ. [illegible]जीवनी अशोक पाटील | ओम अमित हौसिंग सोसायटी, ए विंग शिवाजी रोड, पनवेल रायगड | |
| १० | सौ. ज्योति डी. पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, दुसरा माळा, शिवाजी रोड, पनवेल रायगड | |
| ११ | श्री. गोरख त्रिबंक पाटील | लाईफ लाईन हॉस्पीटल, तिसरा माळा, शिवाजी रोड, पनवेल रायगड | |

स्थळ : पनवेल

दिनांक : २[illegible]

वरिल सह्या करणारे यांना सभासदांना मी ओळखतो. त्यांनी माझ्या समोर ह्या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

ऑन. मॅजि/ ॲडव्होकेट सही शिक्का

ॲड. गज[illegible] पाटील
[illegible] एल.एल.बी.
[illegible]
४, [illegible],
दांडेकर [illegible],
पनवेल, जि. रायगड-४१० २०६

खरी नक्कल म्हणून प्रमाणित
१९.०७.२०२३
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड अलिबाग
१९/०७/२०२३

P. 8

Registered under ... Act 1860
No. ... 223 ... 2... 
... 9/8/2023

परिशिष्ट "क"

## कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल.

## या संस्थेची नियम व नियमावली

1) नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :-

अ) संस्था : संस्था म्हणजे कै. आबासाहेब बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल ही संस्था नोंदणी कायदा 1860 अन्वये नोंद होणारी संस्था.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड अलिबाग

ब) अध्यक्ष : अध्यक्ष म्हणजे कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेचा अध्यक्ष.

क) उपाध्यक्ष : उपाध्यक्ष म्हणजे कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेचा उपाध्यक्ष.

ड) सेक्रेटरी : सेक्रेटरी म्हणजे कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेचा सेक्रेटरी.

इ) खजिनदार : खजिनदार म्हणजे कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेचा खजिनदार.

सभासद : सभासद म्हणजे कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे सेवाभावी संस्था, पनवेल या संस्थेचा वर्गणी भरुन झालेला आजिव, व वार्षिक सभासद व कार्यकारी मंडळावर निवडून आलेले सभासद.

सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय रायगड विभाग, रायगड अलिबाग

2) कार्यक्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र राज्य असेल.

3) हिशोबाचे वर्ष : संस्थेच्या हिशोबाचे वर्ष एक एप्रिल ते एकतिस मार्च असे राहिल.

4) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :-

अ) कोणत्याही भारतीय सज्ञान व्यक्तीस/महिलेस सभासद होता येईल.

ब) सभासद होण्यासाठी त्याने/तिने संस्थेस लेखी अर्ज करावा.

क) कार्यकारी मंडळाचा या बाबतचा निर्णय हा अंतिम राहिल.

5) सभासदांचे प्रकार

अ) आजिव सभासद होणेसाठी प्रत्येकाने सभासद वर्गणी रुपये 501/ व 5/- प्रवेश फी संस्थेस अदा केली पाहिजे. ते संस्थेचे हयातीत सभासद असतील.

2/-

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

Scanned with OKEN Scanner

P-9



ब) वार्षिक सभासद होणेसाठी सभासदाने वा व्यक्तीने दरवर्षी रुपये 101/- सभासद वर्गणी अदा करावयास हवी तसेच पहिल्यांदा रुपये 5/- म्हणून प्रवेश फी अदा करावी.

6) <u>सभासदत्व रद्द होणेबाबत :-</u>

कोणताही सभासद कायदेशिर गुन्हेगार असेल, सभासद वर्गणी दिली नसेल, राजीनामा दिल्यास तो राजीनामा कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास, मयत झाल्यास देश सोडून गेली असेल, व्यसनी किंवा गैरवर्तणूक करित असेल, संस्थेला हानी किंवा नुकसान पोहचवित असेल किंवा योग्य कारणावरुन काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल.

7) <u>सर्व साधारण सभा तिचे अधिकार व कर्तव्ये :-</u>

सर्व साधारण सभा म्हणजे संस्थेच्या सभासदांची सभा संस्थेच्या आर्थिक वर्ष संपल्यानंतर दोन महिन्यांचे आंत वार्षिक सर्व साधारण सभा घेतली जाईल. सर्व साधारण सभेची कार्य व अधिकार खालीलप्रमाणे -

अ) मागील सर्व साधारण सभेचा वृत्तांत निर्णय वाचून कायम करणे.

ब) वार्षिक अंदाजपत्रक, जमाखर्चाचे अहवाल वाचून कायम करणे.

क) संस्थेचा वार्षिक जमाखर्च मंजूर करणे, वार्षिक अहवाल मंजूर करणे, कार्यकारिणीच्या आर्थिक धोरणात्मक स्वरुपाचे ठरावांना मान्यता देणे.

ड) आयत्या वेळी येणा-या विषयावर अध्यक्षांचे संमतीने निर्णय घेणे.

इ) संस्थेच्या मालमत्ता विक्री संबधी ट्रस्ट नोंदणी कायदा 1950 व संस्था नोंदणी कायदा 1860 ला अनुसरुन व त्यातील कलमास अनुसरुन निर्णय देणे.

फ) मुदत संपलेली असल्यास कार्यकारी मंडळाची पुढील पाच वर्षाकरिता निवडणूक करणे.

3/-

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

P-10



8) **सर्व साधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

सर्व साधारण सभेची सुचना ही प्रत्येक सभासदास सभेच्या तारखेच्या 15 दिवस अगोदर पोस्टाने किंवा समक्ष देण्यात येईल. त्या सुचनेवर सभेचे ठिकाण, वेळ, विषय व दिनांक लिहलेली असेल. या सभेत 3/5 सभासदांची गणसंख्या असेल जर गणसंख्या पूर्ण झाली नाही तर ती सभा तहकूब ठेवण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा ठरलेल्या वेळेनंतर एका तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा तहकूब झालेल्या सभेस गणसंखेची आवश्यकता असणार नाही. मात्र सभेच्या जाहिर केलेल्या विषया व्यतीरिक्त इतर कोणत्याही विषयावर त्या सभेत निर्णय घेतले जाणार नाही.

9) **विशेष सर्व साधारण सभा तिची कार्ये :-**

काही महत्वांच्या व तातडीच्या कामासाठी सर्व साधारण सभा घेतली जाईल. त्यास विशेष सर्व साधारण सभा संबोधली जाईल. या सभेस 3/5 सभासदाची गणसंख्या राहिल. या सभेस 15 दिवसांची नोटीस पोस्टाने या समक्ष दिली जाईल.

अ) सर्व साधारण सभेची कर्तव्ये व अधिकार विशेष सर्व साधारण सभेत रहातील.

त्या शिवय ज्या महत्वांच्या कामासाठी ही सभा बोलाविली आहे. त्याबाबतचा निर्णय घेणे.

10) **कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांची रचना :-**

अ) संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीत कमी 11 सदस्यांचे असेल.

ब) कार्यकारी मंडळावर संस्थेच्या सर्व सभासदास निवडून जाता येईल.

क) संस्थेच्या कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे पदाधिकारी असतील.

एक-अध्यक्ष, एक-उपाध्यक्ष, एक-सेक्रेटरी, एक-खजिनदार इतर 7 सभासद असतील. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील पदाधिका-यांची निवड कार्यकारी मंडळावर निवडून आलेले कार्यकारी सदस्य आपआपसात बहुमताने करतील.

11) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :-**

पहिले कार्यकारी मंडळ हे पाच वर्षांचे असेल. त्यानंतर सर्व साधारण सभेत निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षांचा असेल. कार्यकारी मंडळाच्या सभासदाची निवड दर पाच वर्षांनी सर्व साधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने करण्यात येईल.

4/-

अध्यक्ष    उपाध्यक्ष

Scanned with OKEN Scanner

P-11



12) कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची कार्ये :-

कार्यकारी मंडळात खालीलप्रमाणे पदाधिकारी असतील. एक-अध्यक्ष, एक-उपाध्यक्ष, एक-सेक्रेटरी , एक-खजिनदार, कार्यकारी मंडळातील पदाधिकरी यांची व त्या अन्वये कार्यकारी मंडळाची कार्ये खालीलप्रमाणे असतील.

अ) अध्यक्षाची कार्ये व अधिकार :-

अ) संस्थेच्या सर्व सभा व्यवस्थित चालविणे, व त्यांचे संचालन करणे, सभा बोलाविणे.

ब) सभेत समान मते पडल्यास निर्णायक जादा मत देणे.

क) संस्थेच्या कारभारावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे.

ब) उपाध्यक्षाची कार्ये :-

अ) अध्यक्षांचे कामात मदत करणे.

ब) अध्यक्षांचे गेरहजेरीत त्यांचे कामकाज पहाणे.

क) सेक्रेटरीची कार्ये :-

1. संस्थेच्या सर्व प्रकारचा पत्र व्यवहार पाहणे.
2. नियमाप्रमाणे लागणारे आवश्यकतेनुसार सर्व प्रकारचे रजिष्टर ठेवणे.
3. सभेचे सर्व ठराव अंमलात आणणे.
4. संस्थेचे हिशोब पडताळून पाहणे व तशा स्वाक्ष-या करणे.
5. संस्थेच्या सेवक वर्गाच्या अडी अडचणी समजावून घेवून त्या संबधी कार्यकारी मंडळात ठराव मांडणे व त्या विषयी योग्य तो निर्णय घेणे.
6. अध्यक्षांचे परवानगीने व त्यांचे सहीने सर्व सभांच्या कार्यक्रम पत्रिका पाठविणे.
7. कार्यकारी मंडळाने ठरविल्यास त्यांचे वतीने संस्थेच्या दस्ताऐवजावर सह्या करणे.
8. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना त्यांचे कार्यात मदत करणे.
9. संस्थेच्या आर्थिक हिशोब तयार करणे वा करवून घेणे.
10. त्या संबधीची सर्व माहिती कार्यकारी मंडळास देणे.

5/-

अध्यक्ष उपाध्यक्ष

P-12



१२) खजिनदाराची कार्ये :-

१. बँकेवरिल व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.
२. संस्थेचा व्यवहाराचे लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल सादर करणे.
३. सर्व आर्थिक बाबीवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्या नोंदी ठेवणे.

१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

कार्यकारी मंडळाची सभा ही जास्तीत जास्त तीन महिन्यातून एकदा घेणात येईल. अश्या प्रकारे एका वर्षात कमीत कमी चार सभा घेण्यात येतील. तसेच महत्वाच्या अथवा तातडीच्या कामासाठी कार्यकारी मंडळाची सभा बोलाविण्यात येईल. त्यासाठी कमीत कमी १/३ सभासदानी अध्यक्षाकडे लेखी मागणी करणे आवश्यक आहे. ही तातडीचे तिला मागणीची सभा किंवा तातडीची सभा असे संबोधिण्यात येईल. सदर सभा अध्यक्षांनी १५ दिवसाच्या सभा बोलाविण्याचा अधिकार अध्यक्षांचा राहिल. आत न बोलाविल्यास मागणी करणारे सभासद अशी सभा बोलावतील.

१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-

प्रत्येक कार्यकारी मंडळाची सभेची सुचना ही सात दिवसाअगोदर पोस्टाने व समक्ष दिली जाईल. सभेला कार्यकारी मंडळातील सदस्यांची गणसंख्या ही २/३ राहिल. पण गणसंख्येची अभावी सभा जर तहकुब झाली तर तहकुब झालेली सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर एका तासाने घेण्यात येईल. अशा तहकुब सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. मात्र अशा सभेत विषय पत्रिकेशिवाय कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही. अथवा निर्णय घेतले जाणार नाही. महत्वाच्या अथवा तातडीच्या कामासाठी जी सभा बोलाविण्यात येईल. त्या सभेला पाच दिवसांची नोटीस अथवा सूचना पोस्टाने अथवा समक्ष देण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे नियम हे वरिलप्रमाणे असतील.

१५) कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :-

अ) कार्यकारी मंडळाची निवडणूक सर्व साधारण सभेत दर पाच वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

ब) या संस्थेच्या सर्व सभासदास निवडणुकीत उभे राहता येईल.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-

कार्यकारी मंडळातील पद अथवा जागा नियम कमांक ६ प्रमाणे व पुढील कारणाने सभासद मृत्युमुळे, राजीनामा दिल्यामुळे व तो कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास, वेडा झाल्यास, कार्यकारी मंडळातील एखादे पद रिक्त झाल्यास उर्वरित सभासद

६/-

अध्यक्ष उपाध्यक्ष सेक्रेटरी

P-13



संस्थेच्या सर्व सभासदामधून उर्वरित कालावधीसाठी त्यांचे बहुमताने असे रिक्त पद वा जागा भरुन काढतील. असे रिक्त पद व जागा तिने महिन्यात भरली नाही तर मा. सहायक धर्मादय आयुक्त रायगड विभाग पनवेल यांना भरणेची अधिकार राहिल.

17) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-

अ) संस्थेच्या उद्देशाकरिता निधी जमा करणे, वाढविणे त्याचा विनियोग करणे, योग्य अशी गुंतवणूक करणे, देणग्या, शासकीय व निमशासकिय अनुदान स्विकारणे.

ब) ट्रस्ट कायदा 1950 व त्या खालील नियमाना अनुसरुन संस्थेच्या उद्देश पूर्ती साठी कर्ज घेणे व ठेवी स्विकारणे.

क) दैनदिन खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व त्या खालील रक्कम मंजूर करणे व खर्चास वेळोवेळी मंजूरी देणे.

ड) ट्रस्ट नोंदणी कायदा 1950 च्या नियमांना अधिन राहून संस्थेच्या नावाने जंगम व स्थावर मिळकत खरेदी करणे. व त्यावर इमारती वा वास्तु बांधणे, गहाण ठेवणे, व त्या भाड्याने वा लिज पध्दतीने देणे व त्यांचा उपयोग करुन संस्थेच्या उद्दिष्टांची पुर्ती करणे.

इ) संस्थेच्या उपक्रमाच्या व योजनांच्या अंमलबजावणी साठी आवश्यक त्या विषय समित्या व पोटसमित्या नेमणे. त्यांची सदस्य संख्या कार्यकाल, कार्यक्षेत्र, कार्यपध्दती, अर्थ व्यवस्था वगैरे सर्व ठरविणे, तसेच त्या समित्या मध्ये सर्व सदस्यामधून योग्य व अनुभवी व तज्ञ व्यक्तीस नेमणे.

फ) आवश्यक तो नोकर वर्ग नेमणे, त्यांचे पगार ठरविणे व त्यांना सेवेतून मुक्त करणे.

ग) कार्यकारी मंडळावर मुदती आधी जागा रिकामी झाल्यास ती बहुमतीने भरुन काढणे.

ह) सनदी लेखापाल (ऑडिटर) यांची नेमणूक करणे.

प) तसेच ट्रस्ट नोंदणी कायदा 1950 व संस्था नोंदणी कायदा 1860 ला अनुसरुन उद्देश पूर्तीसाठी कार्य करणे.

उपाध्यक्ष

7/-

Scanned with OKEN Scanner

P-14



18) <u>संस्थेचा निधी मिळकती व विनियोग :-</u>

संस्थेचा निधी व देणग्या व शासकिय व निमशासकिय अनुदाने स्विकारुन देणग्या, गोळा करुन गोळा करण्यात येईल. व तो सातत्याने वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. निधी व मिळकतीच्या विनियोग संस्थेच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी करण्यात येईल.

19) <u>उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुद :-</u>

संस्थेच्या सर्व उद्दिष्टावर सम प्रमाणात खर्च करण्यात येईल. यास उद्देशाचे गरजेनुसार व काळाप्रमाणे व परिस्थितीस अनुसरुन यात बदल केला जाईल. या बाबतची सुचना मा. सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात वार्षिक तपासणी अहवाला बरोबर दिला जाईल.

20) <u>कर्ज किंवा ठेवी या संबधीची तरतुद :-</u>

संस्थेचे उद्दिष्ट पुर्तीसाठी सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम 1950 चे कलमास अधिन राहुन कार्यकारी मंडळाचे ठरावानुसार अध्यक्ष व सेक्रेटरी संस्थेस लागणारी कर्ज घेतील. व ठेवी स्विकारतील व या कर्जाचा वा ठेवीचा योग्य तो वापर झाला किंवा नाही. यांची जबाबदारी कार्यकारी मंडळावर राहिल. कर्ज व ठेवी मा. धर्मादाय आयुक्त मुंबई महाराष्ट्र राज्य यांची पुर्व परवानगीने घेण्यात येईल.

21) <u>स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे याबाबतची तरतुद :-</u>

ट्रस्ट कायदा 1950 चे अधिन राहुन संस्था सीवर मालमत्ता खरेदी व विक्री करेल. अथवा भाडयाने घेईल व देईल. अथवा गहाण ठेवेल वा लायसिंग पध्दतीने देईल. या मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न हे संस्थेच्या अधिन उद्दिष्ट पुर्तीसाठी वापर करण्यात येईल. या बाबतचे व्यवहार मा. धर्मादाय आयुक्त मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे पुर्व परवानगीने करण्यात येईल.

22) <u>बँक खाते वा संस्थेचा आर्थिक व्यवहार :-</u>

संस्थेकडे येणा-या निधी पैकी रु. 500/- इतकी रक्कम हातात ठेवुन बाकीची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडुन संस्थेच्या नावाने ठेवता येईल. बँकेचे खात्यातील व्यवहार हे अध्यक्ष व सेक्रेटरी या दोघांच्या संयुक्त सहिने होतील.

8/-

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सेक्रेटरी

P-15



23) सभासदाची यादी ठेवण्याची पध्दत :-

सन 1971 च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामध्ये उल्लेख केलेली अनुसूच 1,2, व 6 मध्ये कार्यकारी मंडळाची व सर्व साभासदाची यादी व संस्थेमध्ये असलेल नोकर वर्गाची यादी ठेवण्यात येईल. व वेळोवेळी मा. सहायक संस्था निबंधक यांन कळविण्यात येईल. सोबत अनुसूची 1,2,6 जोडलेले आहेत.

24) नियम आणि नियमावतील बदल करण्याची तरतुद :-

ह्या नियमावलीत बदल करणे व नविन नियमावा अंतर्भाव करणे यासाठी वार्षिक सर्व साधारण सभेत अथवा विशेष सर्व साधारण सभेत 3/5 मताधिक्याने मंजुरी मिळवावी लागेल. संस्था नोंदणी कायदा 1860 चे कलम 12 व 12 अ नुसार कार्यवाही केली जाईल.

25) संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतुद :-

संस्थेच्या नावा व उद्देशामध्ये बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम 1860 मधील कलम 12 व 12 अ चा अवंलब केला जाईल. ते तशी मंजूरी सर्व साधारण सभेत 3/5 बहुमताने घेण्यात येईल.

26) विसर्जन :-

कोणत्याही कारणास्तव संस्था विसर्जित अथवा बंद करावयाची असल्यास सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 अन्वये कलम 13 व 14 नुसार संस्था बरखास्ते केली जाईल. सदर संस्थेची सर्व देणी देवून शिल्लक राहिलेली मालमत्ता या प्रकारच्या उद्देश असणा-या व सोसायटी नोंदणी कायदा 1860 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेकडे वर्ग करता येईल. किंवा विलीन करता येईल.

-: दाखला :-

प्रमाणित करण्यात येते की, कै. आबासाहेब उत्तमराव बेडसे, सेवाभावी संस्था पनवेल या संस्थेची नियम व नियमावलीचे सत्यप्रत आहे.

| अ.नं. | नांव | हुद्दा | सह्या/- |
|---|---|---|---|
| 1) | डॉ. प्रकाश शिवदास पाटील | अध्यक्ष | अध्यक्ष |
| 2) | श्री. शिवदास रावजी पाटील | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| 3) | सौ. डॉ. जयश्री प्रकाश पाटील | सेक्रेटरी | सेक्रेटरी |

स्थळ: पनवेल

दिनांक : [illegible]

आ.क्र. 6645/2023
खरी नक्कल म्हणून प्रमाणित
22.07.2023
अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी